# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 04.07.2024** **वार – गुरुवार**

---

पुणे शहरात झिका विषाणूचे रुग्ण आढळलेल्या भागातल्या गर्भवतींचं सर्वेक्षण आणि त्यांच्या आरोग्य तपासणीची मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेत 12 गर्भवतींची तपासणी करून त्यांचे रक्त नमुने विश्लेषणासाठी एनआयव्ही अर्थात राष्ट्रीय विषाणू संस्थेकडे पाठविण्यात आले आहेत. अशी माहिती पुणे महापालिका आरोग्य प्रमुख डॉ. कल्पना बळीवंत यांनी दिली आहे. पुणे शहरात झिकाचा प्रादुर्भाव वाढत चालला असून नागरिकांनी ताप आल्यास सरकारी दवाखान्यांमध्ये डॉक्टरांची त्वरित भेट घ्यावी असं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे.

पिंपरी शहरातली आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी 67 आरोग्य वर्धिनी केंद्र सुरु करण्यात येणार आहेत. शहरातल्या मोकळ्या जागा, झोपडपट्ट्या, समाविष्ट गावं या ठिकाणी हे दवाखाने सुरु करण्यात येणार आहेत. यामधून शहरातल्या गरीब आणि गरजू रूग्णांवर मोफत उपचार केले जाणार आहेत. तशीच ही केंद्र सायंकाळी देखील सुरु ठेवण्यात येणार आहेत. त्यामुळे कामगारांची सोय होणार आहे. यासाठी शासनानं तत्वत: मान्यता दिली असून शासन आदेशाची प्रतीक्षा असल्याचं महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितलं. या ठिकाणी रूग्णांना प्रतिबंधात्मक आणि उपाचाराची सेवा देण्यात येणार आहे.

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी आणि जगद्गुरु श्री तुकाराम महाराज पालखीचं, पालखी तळावरुन प्रस्थान होताच लगेच दुसऱ्या दिवशी तळांच्या स्वच्छतेच्या कामाला गतीनं सुरुवात होऊन सर्वत्र पूर्ण स्वच्छता केली जात असल्याबद्दल विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी यंत्रणेचं अभिनंदन केलं आहे. संपूर्ण वारी निर्मल करण्यासाठी असेच प्रयत्न करावे, असं आवाहनही पुलकुंडवार यांनी केलं आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांमधून मतदान केंद्र सुरु करण्याचा प्रयोग देशात सर्वप्रथम पुणे शहरात राबवण्यात आला. पुणे आणि परिसरातल्या 35 मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांमधून यावेळी मतदान केंद्र सुरु करण्यात आली आणि परिसरातल्या किमान चार हजार मतदारांनी त्याचा लाभ घेतला. या यशस्वी प्रयोगानंतर निवडणूक आयोगानं आगामी विधानसभा निवडणुकीत संपूर्ण राज्यात हा प्रयोग अंमलात आणण्याचा निर्णय घेतला आहे .

पिंपरी चिंचवड महापालिकेतलं सर्व प्रशासकीय कामकाज मराठी भाषेतून करण्यात यावं, यासाठी सर्व विभागप्रमुख, अधिकारी कर्मचारी यांना महापालिका प्रशासन विभागाच्या वतीनं सूचना देण्यात आल्या आहेत. महापालिकेकडून राबविल्या जाणा-या योजनांची माहिती, दूरध्वनीवरील संभाषण, जनतेशी पत्रव्यवहार, वरिष्ठ अधिकाऱ्यांचं सभेतील भाषण, अधिकारी आणि कर्मचारी यांची स्वाक्षरी मराठी भाषेत असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीनं देण्यात येणारा प्राचार्य शं. वा. तथा सोनोपंत दांडेकर स्मृती पुरस्कार यावर्षी डॉ अलका चिडगोपकर यांच्या 'मध्ययुगीन मराठी संत कवयित्रींची काव्यधारा' या ग्रंथाला जाहीर झाला आहे. रोख रक्कम आणि

सन्मानपत्र असं पुरस्काराचं स्वरूप आहे. पुरस्कार प्रदान समारंभ 9 जुलै होणार असल्याची माहिती महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा मिलिंद जोशी यांनी दिली आहे.

पुणे शहरात खासगी सहभागातून कौशल्यवर्धन केंद्र उभारण्यात येणार आहे. त्यासाठी टाटा टेक्नॉलॉजी लिमिटेडसोबत सामंजस्य करार केला जाणार आहे. मात्र, प्रकल्पासाठी विलंब झाल्याने प्रकल्पाची 225 कोटींची किंमत वाढून ती 279 कोटी रुपये झाली आहे. त्याबाबतच्या प्रस्तावाला स्थायी समितीकडून नुकतीच मान्यता देण्यात आली.

शेततळ्यांमध्ये पडून जीवितहानीच्या घटना टाळण्यासाठी कृषी विभागातर्फे मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या असून शेतकऱ्यांनी शेततळ्याला कुंपण करून घ्यावं, असं आवाहन करण्यात आलं आहे. प्रत्येक शेततळ्यामध्ये ट्युब ठेवाव्यात, चहुबाजूंनी गाठी मारलेले दोरखंड ठेवण्यात यावेत, दोरखंडाची चौकोनी जाळी प्लॅस्टिक कागदाच्या उतारावर लावावी, असं आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी केलं आहे.

शेतीमालाला आणि दुधाला बाजारभाव मिळावा म्हणून शेतकरी वर्गानं संघटित होऊन संघर्ष सुरू ठेवावा, असं प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी आज पुण्यात केलं. खडकी इथं शेतकरी मेळाव्यात शेट्टी बोलत होते. दुधाला प्रतिलिटर 40 रुपये बाजारभाव मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गस्थ होत असताना सासवड जेजुरी रस्ता, वाळुंज फाटा इथं वारकऱ्यांचा स्वयंपाक सुरु असताना घरगुती सिलेंडरनं पेट घेतला. पुणे अग्निशमन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणल्यानं अपघात टळला.

कल्याणीनगर अपघात प्रकरणातल्या मुलाचे वडील विशाल आगरवाल याला बावधनमधल्या सोसायटी धारकांची फसवणूक केल्या प्रकरणी अटक करण्यात आली. त्याला न्यायालयात हजर करण्यात आलं असून तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**